वचने ओतप्रोत भरलेली आहेत. त्यात धर्माची धारणा नसून असमानतेची धुळवंड घातली आहे".

हिंदु धर्माच्या नावाखाली ब्राम्हणाने राष्ट्राच्या प्रगतीला बाधा आणून राष्ट्राची अधोगती केली. स्त्रीया, शुध्द, अतिशुद्र, बहुजन समाजाला जवळ-जवळ ८० ते ८५ % समाजाला ब्राम्हणाने आपल्या स्वार्थापायी सर्वच अधिकारापासुन वंचीत, अज्ञानी ठेवून राष्ट्राची अधोगती केली. बहुजन समाजाला निष्क्रीयतेच्या गर्तेत टाकुन राष्ट्रीय उन्नतीत, राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटा बंद केल्या. स्वार्थापोटी ब्राम्हणांनी राष्ट्रद्रोह केला हा गुन्हा अक्षम्य होय.

म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाच्या प्रगतीसाठी जाती विरहित, वर्ग विरहित असा समाज असण्याची आवश्यकता वेळोवेळी प्रतिपादन केली. परंतु हिंदु धर्मातील विषमताधिष्ठीत समाजव्यवस्थेमुळे येथील अस्पृश्यांची अधोगती झाली. या अधोगतीला हिंदू धर्मच जबाबदार आहे अशी आमची खात्री झाली आहे. येथील धर्ममार्तंडांनी पददलितांची केलेली कोंडी पाहून हा अन्यायकारी धर्मच नाकारला पाहिजे या विचारावर ठाम निर्णय झाला असून दि. १३ व १४ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला जि. नाशिक येथे धर्मांतराची जाहीर घोषणा केली आणि म्हटले की, "आठ कोटी अस्पृश्यांना गुलामगिरीत डांबणारा कोटयावधी बहुजन समाजाला अज्ञान, दारिद्रय व रुढी यांच्या अंधारात दडपणारा आणि असंख्य स्त्रियांना माणूसकीतून उठवणारा हा धर्म नव्हे. या गुलामगिरीच्या शृखंला आहेत त्या आम्ही आज तोडावयाच्या ठरविल्या आहेत". म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यावर आधारलेला समाज निर्माण करणे हे माझे ध्येय आहे".

या ध्येयाशी ते शेवटपर्यंत चिकटून राहिले. स्वत्व, स्वाभिमान, ध्येयपूर्तता, माणूस, समाज आणि देश यावर ते प्रेम करत जगले, तरच त्या जगण्याला अर्थ आहे, प्रयोजन आहे असे त्यांना वाटे. महात्मा फुले, छत्रपती शाहु, डॉ. आंबेडकरांनी हजारो वर्षांच्या विषमतामुलक व्यवस्थेविरुध्द बंड करुन सामाजिक समतेची चळवळ नेटाने चालवली. त्यांच्या क्रांतीकारी कार्यामुळे आजचा पुरोगामी, परिवर्तनशील महाराष्ट्र आपणास दिसून येत आहे.

**संदर्भ सूची -**

१. रौलिन चेम्ब्लिस १९५४ सोशल थॉट, प्रकाशक स्थळ - न्यूयॉर्क
२. दत्ता कुलकर्णी - महात्मा फुले - सामाजिक क्रांतीचे अग्रदूत प्रकाशक - गजेंद्र विठ्ठल सुर्यवंशी, पुणे
३. धनंजय कीर - २०११ राजर्षी शाहू छत्रपती प्रकाशक - हर्ष भटकळ, मुंबई
४. संपादक मंडळ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ

**35**

# महात्मा जोतिराव फुले यांचे सामाजिक कार्य

प्रो. डॉ. किशोरकुमार गव्हाणे
इतिहास विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या सामाजिक — सांस्कृतिक जडण घडणीमध्ये महात्मा जोतिराव फुले यांनी दिलेले योगदान अतुलनीय स्वरूपाचे आहे. प्राचीन काळ ते पेशवाईपर्यंतचा काळ हा धर्मपरंपराचे जोखड घेवून चालणारा काळा होय. धर्मपरंपरांचे जोखड घेवून चालणाऱ्या काळातच महात्मा फुले यांच्या रूपाने एक महान समाज सुधारक उदयास आला. महाराष्ट्राच्या समाज व धर्म सुधारणा चळवळीच्या इतिहासात महात्मा फुले यांच्यापासून एका नव्या प्रवाहाची सुरूवात झाली. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून पुढील काळात छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि कर्मवीर भाऊराव पाटील या थोर समाज सुधारकांनी समाज सुधारणेच्या कार्यास वाहून घेतले. महात्मा फुले यांनी भारतीय समाजाच्या समग्र सामाजिक अभिसरणाला आधुनिक काळात प्रारंभ केला आणि एकूणच भारतीय समाजात उलथापालथ सुरू झाली. महात्मा फुले यांची दृष्टी अलौकिक स्वरूपाची होती. भारतात स्त्री शिक्षणाचा व अस्पृश्य शिक्षणाचा पाया घालणारे ते आद्य सुधारक होते. सामाजिक विषमतेविरूध्द त्यांनी उठाव केला. शेतकरी व कामगार यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे निर्मूलन करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. मानवी स्वातंत्र्य, हक्क व समता या तत्व प्रणालीचा पुरस्कार केला. प्रस्तुत निबंधामध्ये महात्मा फुले इ.स.१८२७—१८९० यांचे कार्य नव्या परिप्रेक्षातून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**जीवन वृत्तांत :–**

महात्मा जोतिराव फुले यांचा जन्म इ.स. १८२७ मध्ये पुणे येथे झाला. फुले घराण्याचे मूळ सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होय. त्यांचे मूळ उपनाव गोऱ्हे असे होते. ते जातीने क्षत्रिय माळी होते. ते कटगुणचे चौगुले होते. बारा बलुतेदारांपैकी चौगुले हे एक होते. जोतिरावांचे आजोबा शेटीबा कामा धंद्यानिमित्त पुण्याला आले. त्यांना राणोजी, कृष्णा व गोविंदा अशी तीन मुले होती.[१] घरच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे प्रारंभी या मुलांनी शेळ्या राखण्याचे काम केले. त्यांच्या धन्याने त्यांचा प्रामाणिकपणा, हुशारी व कष्टाळूपणा पाहून त्यांना फुलांचा व्यवसाय शिकविला. त्यांनी या व्यवसायात चांगलाच लौकिक कमावला. त्यामुळे त्यांचे गोऱ्हे हे आडनाव मागे पडून फुले या नावाने ओळखले जावू लागले.[२]

जोतिराव फुले हे एक वर्षाचे असताना त्यांची आई मृत्यु पावली. गोविंदरावांनी दुसरे लग्न न करता मुलांचे संगोपन चांगले केले. वयाच्या सातव्या वर्षी त्यांना खाजगी शाळेत पाठवले. त्यांचे वन १३ असतानाच त्यांचा विवाह धनकवडीच्या झगडे–पाटील यांच्या सावित्रीबाई या कन्येशी झाला. जोतिबांना शाळेत घातल्यानंतर काही दिवसातच काढून टाकण्यात आले. पुढे गोविंदरावांच्या शेजारी राहणाऱ्या 'गफार बेग मुन्शी' या मुसलमान विद्वावानाच्या व मि. लेजीट साहेबांच्या उपदेशावरून १४ व्या वर्षी (१८४१) इंग्रजी पहिल्या वर्गात घालण्यात आले.[३] त्यांचा दृढ निश्चय, अभ्यास करण्यासाची चिकाटी व हुरूप यामुळे त्यांची इंग्रजी शिक्षणात चांगलीच प्रगती दिसून आली. ते सर्व परीक्षात प्रथम रेणीचे गुण मिळवत असत. त्यामुळे त्यांचे शिक्षण आणि वर्ग बंधू त्यांची वाहवा करत असत.[४]

जोतिराव दिवसभर पढाई शिक्षण व सांजसकाळ तालीमखाण्यात जावून लढाईचे शिक्षण असे दुहेरी शिक्षण घेत होते. लढाईचे शिक्षण लहुजीबुवा मांग यांच्याकडून मिळत होते. पुण्यातील ब्राह्मण गुरूजीकडून मि. टॉमस, जॉर्ज वॉशिंग्टन, छ.शिवाजी महाराज आणि नेपोलियन बोनापार्ट यांच्या चारित्र्यापैकी काही गोष्टी त्या कोवळ्या मनाच्या विद्यार्थ्यांना शाळेत शिकवण्यात येवू लागल्या.[५] थॉमस पेन या अमेरिकन विचारवंताच्या Rights of Man या ग्रंथातील विचारांनी ते प्रभावीत झाले. तत्कालीन समाजात सामाजिक विषमता, अस्पृश्यता, अंधश्रध्दा, अनिष्ठ चालिरिती व परंपरा शिगेस पोहचल्या होत्या. हिंदू समाजातील ब्राह्मण वर्गाच्या सामाजिक व धार्मिक अन्यायाने बहुजन समाज भरडला जात होता. हा समाजहिन अवस्थेत आपले जीवन जगत होता. बहुजन समाजात जागृती करून त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न जोतिरावांनी केले. यासाठी जोतिरावांनी केलेले समाज सुधारणेचे कार्य फारच महान होते.

**महात्मा जोतिराव फुलेंचे कार्य :–**

**स्त्री शिक्षण :–**

स्त्रियांना सुशिक्षित केले तर सर्व सुधारणांचा पाया घातला जाईल हे अचूकपणे त्यांनी जाणले. शतकानुशतके हिंदू समाजातील स्त्रीवर्ग हा शिक्षणापासून वंचित होता. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी' हा जोतिबांचा क्रांतीचा मूलमंत्र होता. इंग्रज आयुक्तांनी १८२१ मध्ये काढलेल्या संस्कृत पाठशाळेत ब्राह्मणांनाच प्रवेश दिला जाई. इतरांना त्यात बंदी होती.[६] जोतिरावांनी पुण्यात इ.स. १८४८ मध्ये बुधवार पेठेत भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा स्थापन केली. स्त्रियांच्या शाळेत शिकवायला शिक्षिका मिळत नव्हती म्हणून त्यांनी प्रथम आपली पत्नी सावित्रीबाईस शिक्षण व शिक्षिकेचे काम करण्यास पाठविले. इ.स. १८५३ पर्यंत मुलींना शिक्षण देणाऱ्या एकूण ३ शाळा सुरू केल्या. या तिन्ही शाळेत एकूण २७३ मुली शिक्षण घेवू लागल्या.[७]

**अनाथ बालकाश्रम व पुनर्विवाह :–**

तत्कालीन हिंदू समाजात बालविवाह ही पध्दत रूढ होती. मुला–मुलींचे विवाह त्यांच्या बाल वयातच होत होते. पती मृत्युनंतर मुलीला आयुष्यभर विधवा अवस्थेत आपले जीवन जगावे लागत होते. एखादी तरूण विधवा वासनेची बळी ठरली तर जन्मास येणाऱ्या बालकाची गुप्तपणे हत्या करण्यात येत असे. जोतिरावांनी आपल्या घराशेजारी स्वत:च्या खर्चाने एक वाडा बांधून घेतला आणि त्या ठिकाणी विधवांनी गुप्तरितीने येवून बाळंत होवून मूल ठेवून जावे अशी सोय केली. 'कोणी विधवेचे अज्ञानपणाने वाकडे पावूल पडून ती

गरोदर झाली, तर तीने जोतिरावांनी स्थापन केलेल्या गृहात गुप्तपणे येवून बाळंत होवून जावे.[९] अशा मोठमोठ्या अक्षरांच्या जाहिराती साऱ्या पुणे शहरात भिंतीवर लावण्यात आल्या होत्या. पुढे याच बालहत्या प्रतिबंधक गृहात एका काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेच्या पोटी जन्मलेल्या मुलाला जोतिरावांनी दत्तक घेवून यशवंत असे नामकरण केले.[९] त्याला डॉक्टर करून आपले मृत्युपत्रही त्याच्या नावे करून ठेवले. स्वत:च्या पोटी मूल बाळ नसताना एका परजातीय मुलाला दत्तक घेतल्यास जातिभेद मोडू शकतो याचे हे एक जागते उदाहरण होय.[१०]

जोतिराव फुले ब्राह्मण द्वेष्टे होते असे म्हटले जाते. परंतु समाजातील कोणत्याही घटकांवरील अन्यायाने त्यांचे मन व्याकूळ होत असे. त्याकाळी ब्राह्मण समाजात विधवा स्त्रियांचे फार हाल असत. हे पाहून त्यांचे मन अस्वस्थ झाले. स्त्रियांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून जोतिरावांनी विधवा पुर्नविवाहाचा धडाडीने—पुरस्कार केला. त्यांच्या परिश्रमाने इ.स. १८६४ साली पुण्यात गोखल्यांच्या बागेत शेणवी जातीत रघुनाथ व नर्मदा या दोघांचा महाराष्ट्रातील पहिला पुनर्विवाह घडवून आणला होता.[११]

**अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य :—**

महाराष्ट्रात अस्पृश्यता ही वंशपरंपरेने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. उच्चवर्णीयांकडून अस्पृश्यांना अत्यंत हिन वागणूक दिली जात होती. ज्या हिंदू धर्मात महात्मा जोतिराव फुले जन्माला आलेले होते, त्या हिंदू धर्माची उभारणी मुळी ब्राह्मणी व्यवस्थेने अशा प्रकारे करून ठेवलेली होती की, वर्षानुवर्षे शुद्रातिशुद्र मानसीक गुलामगिरीत राहून राहून त्यांची विचारशक्तीच कुंठित झालेली होती.

मांग महारादी। जेर झाले भारी।।
विसरले आपल्या महत्वास।।
उमजेना शत्रुकाव्यास।।[१२]

जोतिराव फुले यांच्या मते, अस्पृश्यांनी दबून रहावे म्हणून आर्यानी धर्मग्रंथाची निर्मिती केली.[१३] अस्पृश्यांना ज्ञानबंदी करण्यात आली. व्यवसाय बंदी करण्यात आली. शुद्रादि—शुद्र—अनार्य हे देखील मूळ रहिवाशी आहेत असे फुलेंचे प्रतिपादन आहे. या दृष्टी त्याने अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले. इ.स. १८५१ मध्ये पुणे येथे वेताळ पेठेत अस्पृश्यासाठी दोन शाळा स्थापन केल्या. लहुजी मांग व राणबा महार[१४] यांना हाताशी धरून त्यांनी अस्पृश्यास शिक्षणाची गोडी निर्माण केली. इ.स. १८५८ पर्यंत अस्पृश्यांसाठी तीन शाळा सुरू केल्या. त्यांच्या कार्याला ब्रिटीश सरकारने 'दक्षिणा प्राईज फंडा'तून आर्थिक मदत केली.[१५]

**सत्यशोधक समाजाची स्थापना :—**

हिंदू समाजात वरिष्ठ वर्गाचे धार्मिक व सामाजिक प्रबल्य होते. या समाजातील ब्राह्मण वर्ग इतर वर्गांना तुच्छ मानीत होता. तर स्वत:ला मात्र श्रेष्ठ समजत होता. सामाजिक सुधारणेसाठी व ब्राह्मण वर्गाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याच्या हेतूने महात्मा फुले यांनी २३ सप्टेंबर १८७३ मध्ये पुणे येथे 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. या समाजाचे तत्वज्ञान सारांशाने पुढीलप्रमाणे,[१६]

१. ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण सत्यमय आहे.
२. परमेश्वराची प्रार्थना करण्याचा हक्क प्रत्येक मानवाला आहे.
३. मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणाने श्रेष्ठ ठरतो.
४. पुनर्जन्म, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून महात्मा जोतिराव फुले यांची निवड झाली. सत्यशोधक समाजात सर्व जातींना प्रवेश होता. १७ 'सर्व साक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्थी' हे या समाजाचे ब्रीद वाक्य होते. दर रविवार सामुदायिक प्रार्थना, १५ दिवसात एक व्याख्यान आयोजित केले जाई. कनिष्ठ जातीतील लोकांना ब्राह्मणाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणे हे सत्यशोधक समाजाच्या स्थापने मागचे प्रमुख उद्दिष्ट होते. या समाजाचे सभासदत्व सर्व जातीसाठी खुले ठेवले होते. ब्राह्मण, मांग, महार, ज्यू हे प्रारंभी सत्यशोधक समाजाचे सभासद होते. थोडक्यात बहुजन समाजात जागृती करून त्यांच्यात सामाजिक परिवर्तन करण्यासाठी

सत्यशोधक समाजाची महात्मा जोतिराव फुले यांनी स्थापना केलेली होती.

**समारोप :—**

जोती म्हणजे ज्योत दुसऱ्यास प्रकाश देते व स्वत: नाहीशी होते. त्याचप्रमाणे जोतिरावांनी समाज सेवेत स्वत: झिजून संपूर्ण महाराष्ट्रात आपले नाव अजरामर केले. जोतिराव फुले हे पददलित वर्गाच्या उध्दारासाठी झटले. त्यांनी समाज सेवा करताना वैयक्तिक मोह कधीच बाळगला नाही. त्यांनी आपले व्यक्तिगत जीवन समाजजिवनात विलीन केले होते. सत्यशोधक समाजाच्या रूपाने त्यांनी महाराष्ट्रात प्रबळ संघटना निर्माण केली. जोतिरावांनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रात त्यांनी शिक्षणाबरोबरच अस्पृश्यांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. समाजाने अनेक बंधनानी स्त्रियांना जखडून ठेवले होते. अशावेळी महात्मा फुलेंनी स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. स्त्री ही समाजाचे मूळ आहे असे मानून जोतिबांनी स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपन यासारख्या महत्वाच्या सामाजिक समस्येबाबत भरीव कार्य केले. जोतिरावांच्या कार्याचे वर्णन करताना धनंजय कीर म्हणतात,''जोतिरावांचे नाव जोती आणि जोती म्हणजे ज्योत, त्या ज्योतीने सामाजिक समता, मानवता आणि विवेक वाद यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविल. त्यांचे उपनाव होते फुले आणि फुले म्हणजे फुलांचा धंदा करणारे फुलमाळी, या माळ्याने राष्ट्ररूपी बागेतील सामाजिक एकतेच्या वाढीला विरोध करणारी तणे, बांडगुळे उपटून फुल झाडांची उत्तम जोपासना केली.''

**संदर्भ :—**

१. भिडे, पाटील, थोरात— महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै २००८, पृ.क्र. ७३

२. कोंडेकर, भद्रे, शेटोड— आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जून २०११, पृ.क्र.१००

३. मुंडे सुलभा— महात्मा फुले यांचे शुद्रातिशुद्रविषयी विचार, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०००, पृ.क्र. ३२.

४. कित्ता, पृ.क्र. १५

५. पाटील पंढरीनाथ सिताराम — महात्मा जोतिबा फुले यांचा अल्प परिचय, छापखाना, जळगाव, दुसरी आवृत्ती, १९३८, पृ.क्र. ०४.

६. कीर धनंजय — महात्मा फुले—गौरवग्रंथ (संपा. साळुंके पी.बी.) म.रा.शि. विभाग मंत्रालय, मुंबई, १९८२, पृ.क्र. १२३

७. भिडे, पाटील, थोरात— भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. ८०

८. कीर धनंजय— पुर्वोक्त, पृ.क्र. १३८

९. मुंडे सुलभा — पुर्वोक्त, पृ.क्र. ४४

१०. भिडे, पाटील, थोरात — पुर्वोक्त, पृ.क्र. ७८

११. कित्ता, पृ.क्र. ७७

१२. फुले महात्मा जोतिराव— ब्राह्मणांचे कसब, महात्मा फुले समग्र वाङ्मय (संपा. फडके य.दि.) १९९१ पृ.क्र. ९२

१३. परदेशी, लोखंडे, चव्हाण — फुले, शाहू, आंबेडकर आणि जातिव्यवस्था अंत, सावित्रीबाई फुले प्रकाशन, नाशिक, २००० पृ.क्र. १२

१४. कोंडेकर, भद्रे, शेटोड— पुर्वोक्त, पृ.क्र. १०४

१५. भिडे, पाटील, थोरात — पुर्वोक्त, पृ.क्र. ८९

१६. पवार जयसिंगराव— हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८ पृ.क्र. ६६

१७. कित्ता पृ.क्र. ६६

❑❑❑



S.P. Mahavidyalaya, Bhoom BHOOM Dist. Osmanabad
Principal
S.P.Manavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad